असेच दिवाळीचे दिवस होते. एका कुटुंबात खूप नातेवाईक एकत्र जमले होते. त्यात तरुण अन् लहान मुलेमुलीही खूप होत्या. कुटुंबात अगदी आनंदाचे वातावरण होते. दररोज दुपारचा सारा वेळ गप्पा, गोष्टी, गाणी, हशा अन् टाळ्या यांतच जायचा, कारण सर्वांनी मिळून दूरदर्शन संच कायमचा बंद ठेवायचा असे ठरवले होते. एकदा मुलामुलींनी 'गाण्यांच्या भेंड्या लावण्याचा खेळ' चालू केला, पण का कोणास ठाऊक, त्यात खूप गंमत काही येईना.

त्या वेळी घरातल्या एक आजी म्हणाल्या, "मी तुम्हांला एका खेळाची कल्पना सांगते. पटते का पहा." सगळ्यांनी एकच गिल्ला केला, 'सांग, आजी सांग. तू सांगशील तो खेळ आम्ही खेळून पाहूच.' आजींचे म्हणणे असे होते, की आपण जे जे पदार्थ खातो-पितो, त्या साऱ्यांची नावे आपल्याला माहीतच असतात, म्हणून आपण सर्वांनी मिळून खायच्या-प्यायच्या पदार्थांच्या नावांची अंत्याक्षरी खेळायची. माझ्यासह अनेकांना असे वाटत होते, की हा अंत्याक्षरीचा खेळ तरी किती वेळ चालणार ? चालेल फारतर पंधरा-वीस मिनिटं. आजींच्या सांगण्याखातर सगळे ही नवी अंत्याक्षरी खेळायला तयार झाले. कोणीतरी म्हणाले, "आजी, हा तुझा खेळ आहे ना ! मग तूच सांग पहिला शब्द." आजींनीही 'हो' म्हणून सुरुवात केली. त्या म्हणाल्या, "हं ! खेळ सुरू झालाय हं ! श्रीगणेशाय नमः, मी प्रथम गणपतीला प्रिय असणाऱ्या पदार्थाचं नाव घेते."

अर्थात त्यांनी 'मोदक' हे नाव घेतले. मग लगोलग त्या शब्दावरून 'मोदक-कडबू', 'कडबू-बालूशाही', 'बालूशाही-हुरडा', 'हुरडा-डांगर', 'डांगर-रायते', 'रायते-तूप', 'तूप-पुरी', 'पुरी-रगडा पॅटीस', 'रगडा पॅटीस-सायसाखर' अशी नावे अगदी हिरिरीने घेतली जाऊ लागली.

या खेळाची गंमत म्हणजे चार वर्षांच्या मुलापासून चौऱ्याऐंशी वर्षांच्या आजीपर्यंत सगळेजण यात अगदी मनापासून सहभागी झाले होते. वयाने मोठी मंडळी स्वाभाविकच जिलेबी, बुंदी, मोतीचूर, अळूवडी इत्यादी पारंपरिक नावे घेत होती, तर तरुण मुलेमुली पिझ्झा, नूडल्स, बास्केट-चाट, काश्मिरी राइस, रुमाली रोटी, माझा, कोला, फ्रुटी, व्हॅनिला वा पिस्ता आइस्क्रीम अशी नावे घेत होती.

बघता बघता त्या घरात जुन्या नव्या खाद्यपदार्थांच्या नावांचे एक महासंमेलनच भरले. पंधरा-वीस मिनिटे चालेल की नाही, अशी शंका आलेला हा शब्दखेळ चांगला दीड-पावणेदोन तास चालला. वेळ कसा निघून गेला ते कोणालाच कळले नाही.

त्या दिवशी माझ्या मनात विचार आला, की आपल्याकडे अनेक प्रकारचे शब्दकोश आहेत, मग खाण्यापिण्याच्या पदार्थांसाठी असणाऱ्या शब्दांचा कोश का असू नये ? खाण्यापिण्याच्या पदार्थांसाठी असलेल्या तिखट-गोड शब्दांची गंमत मला त्या दिवशी पुरेपूर कळली.

# सकारात्मक दृष्टिकोन

• ग. प्र. प्रधान



कलावंताला प्रतिभेचा स्पर्श असतो. तो कल्पनेच्या अवकाशात भराऱ्या घेत नित्य नवे साज घडवतो. आजवरची चोवीस पुस्तके लिहीत असताना मी मात्र वास्तवतेशी नाते जोडले आहे. जीवन जगताना .. जगण्यातले वास्तव पाहताना जे अनुभव येत गेले, ते तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न.

१९३८-३९ पासून मी स्वातंत्र्य चळवळीत कार्यरत झालो. या स्वातंत्र्य चळवळीच्या सहभागामुळे माझ्या

जीवनाला एक नवे वळण मिळाले. त्या निमित्ताने अनेक थोर नेते, स्वातंत्र्यसैनिक यांच्या मी संपर्कात आलो. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंडित जवाहरलाल नेहरू, आगरकर, जयप्रकाश नारायण, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी आणि भगतसिंगसारखे क्रांतिकारक. या सर्वांना मी जवळून पाहिले. जीवन समर्पित करताना त्यामागे त्यांच्या काय प्रेरणा होत्या, त्याचा अभ्यास मला करता आला.



१९४६ ते १९५३ मध्ये सेवादलात असताना मी मुलांना गोष्टी सांगत असे. त्याद्वारे थोरांच्या जीवनातील भव्यता, उदात्तता त्यांच्या मनावर ठसवण्याचा माझा प्रयत्न असे. हल्ली नव्या पिढीबद्दल एक ओरड हमखास होत असते. ती म्हणजे, ही पिढी भरकटलेली आहे, या पिढीला चांगली दिशा नाही, ध्येय नाही. प्रत्युत्तर म्हणून या पिढीचे म्हणणे असे आहे, की 'आमच्यापुढे आदर्श कोण ? सगळीकडे स्वार्थ, भ्रष्टाचार माजला असताना आम्ही कोणाचे अनुकरण करावे ?'

तर बाळांनो, मला असे सांगायचे आहे, की तुम्ही आयुष्यात सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. वाईटातूनही चांगले शोधण्याची वृत्ती अंगी बाणवून घ्या. जिथे भ्रष्टाचाराची मुळे रुजली आहेत, त्याच भूमीत अभय बंग, राणी बंग, प्रकाश आमटेंसारखे लोक निरपेक्ष कार्य करत आहेत. त्यांनी माणुसकी जिवंत ठेवली आहे. अशा लोकांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवा. यातूनच नवनव्या कल्पनांचा जन्म होऊ शकतो.

स्वातंत्र्य चळवळीत असताना प्रत्येकालाच या ना त्या रूपाने त्रास भोगावा लागला, परंतु त्यातही एक प्रकारचा आनंद होता. एखादी गोष्ट मनापासून केली, तर त्यातील कष्ट जाणवत नाहीत. त्या वेळेस आजन्म खादी वापरण्याचा निर्धार अनेकांनी केला, तेव्हा 'देशासाठी केलेला त्याग' असे म्हटले गेले; पण त्याग या शब्दालाच माझा विरोध आहे, कारण खादी वापरणे हा आमचा मनापासूनचा निर्णय होता आणि त्यातील आनंद आम्ही आजतागायत घेत आहोत. त्या वेळेपासून ते आज राहते घर ट्रस्टच्या नावे करण्यापर्यंत साऱ्या गोष्टींतून मी मन:पूर्वक समाधान मिळवले.

एखादी गोष्ट जाणीवपूर्वक करणे महत्त्वाचे. त्यामुळे आयुष्याला एक दिशा मिळते. शौर्याचे आकर्षण सर्वांनाच असते. हे शौर्य चांगल्या प्रकारे कामी यायला हवे. माझे अनेक विद्यार्थी मला आजही भेटतात. त्या वेळेस ज्या गोष्टी मी सांगत असे, त्याचा सखोल परिणाम आयुष्यावर झाला आहे, असे सांगतात. याचे मला समाधान आहे. एखाद्या प्रसंगातून, व्यक्तीकडून आपण चांगले ते निवडून घ्यावे, हाच सकारात्मक दृष्टिकोन. आयुष्यात सदैव तोच आठवा. मग तो एखादा कलेचा प्रांत असो, अभ्यास असो वा देशसेवा... यश तुमचेच आहे.

*(शब्दांकन : संगीता पुराणिक)*

# आणि चित्रपट तयार होतो

• सुमित्रा भावे



एखादं चित्रं काढणं, एखादी कथा लिहिणं या सगळ्याला कल्पकता लागते, पण एखादा सिनेमा तयार करणं ? त्याला कल्पकतेचा एक पैलू पुरेसा नसतो, तर विविध पैलूंचा कस लागतो. त्यात आधी कथा निर्माण करावी